माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज

तक्रार क्र.रामाआ /तक्रार १६०/२०२२/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| तक्रारदार | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| मधुसुदन पिराजी शिलवंत | मुख्य प्रशासकिय अधिकारी सहसंचालक आरोग्य सेवा (लेखा व आस्थापना विभाग) (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे आरोग्य भवन, आंळदी रोड, पुणे ४११ ००६ | सहाय्यक संचालक सहसंचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे आरोग्य भवन, पुणे ४११ ००६ |

<u>तक्रार सुनावणी दि.३०/११/२०२३</u>

तक्रारदार यांनी दि.२०/०६/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"आयोगाने व्दितीय अपील क्रमांक २५९/२०२१ मध्ये दि.२९/०१/२०२२ रोजी आदेश पारित केला. त्यामध्ये आयोगाने विद्यमान जन माहिती अधिकारी, (लेखा व आस्थापना) सहसंचालक, आरोग्य सेवा विभाग (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे यांना आदेश प्राप्तीच्या १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने माहिती देण्याबाबत आदेशीत केले होते.

सुनाणीचेवेळी डॉ.अशोक शंकर रणदिवे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा हे उपस्थित होते. त्यांनी सुचित केले की, आयोगाच्या आदेशाच्यावेळी ते जन माहिती अधिकारी होते. आयोगाचे आदेश दि.२७/५/२०२२ रोजी प्राप्त होते, त्यानंतर दि.१५/६/२०२२ रोजी अपिलार्थीस विनामूलय नोंदणीकृत डाकेने माहिती दिली होती. संबंधित अभिलेख व नोंदणीकृत डाकेचे पोच पावती सादर केली आहे.

यावरुन स्पष्ट होते की, जन माहिती अधिकारी यांनी आयोग आदेशाची अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे तक्रारदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यास पात्र आहे.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश.</u>

तक्रारदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.